ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80 Licence No. 175

वर्ष ३१ | पुणे, बुधवार १५ जून, १९६६ | अंक ११

## विविध माहिती

**आशियातील देशांना ब्रिटनची मदत**—आशियातील देशांना २॥ कोटी पौंडांची मदत देण्यासंबंधीचा कायदा ब्रिटनच्या पार्लमेंटमध्ये मांडण्यात आला आहे. ह्या कायद्याचा जो मसुदा प्रसिद्ध करण्यात आला आहे, त्यावरून असे दिसते की सिंधू नदीच्या खोऱ्याच्या विकासाच्या योजनेला ब्रिटनकडून १ कोटी, ३९ लाख, ७८ हजार पौंड साह्य देण्यात येणार असून एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या भांडवलासाठी १ कोटी, ७० लाख पौंडांची तरतूद करण्यात आली आहे. ह्या बँकेच्या भांडवला-पैकी ६० टक्के भांडवल आशियातील देशांनी जमा करावयाचे आहे.

**यवतमाळ येथे सिमेंटचा कारखाना**—असोशिएटेड सिमेंट कंपनीला यवतमाळनजीक सिमेंटचा कारखाना काढण्याची परवानगी भारत सरकारने दिली आहे. ह्या कारखान्यात दरसाल ४ लाख टन सिमेंट तयार करता येणारी यंत्रसामग्री बसविण्यात येणार आहे. ह्या जिल्ह्यात अलीकडेच सिमेंटच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या चुनखडीच्या दगडाच्या खाणी सापडल्या आहेत.

**फोर्ड फौंडेशनच्या देणग्या**—फोर्ड फौंडेशनने दक्षिण व आग्नेय आशियातील देशांसाठी देणग्या जाहीर केल्या आहेत. त्यांत भारतामधील बंगलोरच्या शेती विद्यापीठाला ३ लाख, ३१ हजार डॉलर्सची एक देणगी आहे. वनस्पतींचे किडीपासून रक्षण करण्यासाठी जरूर ते संशोधन करण्यासाठी देणगीचा वापर मुख्यत: करावयाचा आहे. अहमदाबाद येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ह्या संस्थेला ३ लाख डॉलर्सची देणगी देण्यात आली आहे. संस्थेत काम करणाऱ्यांसाठी घरे बांधण्यासाठी देणगीचा विनियोग करण्यात यावयाचा आहे. अमेरिकेतील लुइशिआना विद्यापीठाने भारत सरकारच्या अन्न व शेतकी खात्यासाठी ३ लाख, ४५ हजार डॉलर्सची देणगी दिली आहे. भाताची शास्त्रशुद्ध साठवण करण्यासाठी संशोधन करण्याकरिता ही देणगी देण्यात आली आहे.

**संभाव्य अपघात टळला**—एअर इंडिया वाहतूक कॉर्पोरेशनचे एक विमान कैरो येथील विमान तळावरून उड्डाण करीत असता गंभीर स्वरूपाच्या संभाव्य अपघातातून बचावले. विमान धावपट्टीवरून वेगाने जात असता एकाएकी एक उंट त्याच्या मार्गात आला. वैमानिकाने प्रसंगावधान राखून जरूर तितके अंतर कापले गेलेले नसताही काहीसा धोकादायक कोन स्वीकारून विमानाला हवेत झेप घ्यावयास लावली. उंटाला विमानतळावरून हुसकण्यास १ तास लागला.

**अमेरिकेतील दंगेखोर विद्यार्थी**—अमेरिकेतील शाळांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांत दंगेधोपे करण्याची लाट उसळलेली आहे. विद्यार्थ्यांच्या दंग्यांचा रोख काचा फोडणे आणि शाळेच्या सामानाची नासधूस करणे ह्यावर दिसून येतो. ह्या दंगेखोर प्रवृत्तीमुळे शाळांचे फार नुकसान होत आहे. फक्त न्युयॉर्क शहरातील दंग्यातील विद्यार्थ्यांच्या दंगलीमुळे दरसाल ५० लाख डॉलर्स किमतीच्या मालमत्तेची हानी होत आहे.

**झपाट्याने वाढणाऱ्या वनस्पतींची लागवड**—भारतात झपाट्याने वाढणाऱ्या वनस्पतींची लागवड करण्याची शक्यता अजमावण्यासाठी जागतिक बँकेचे दोन जंगल तज्ज्ञ आले आहेत. त्यांनी उत्तर प्रदेशातील काही भागांत आणि केरळ-मधील काही भागात झपाट्याने वाढणाऱ्या युकॅलिप्टस झाडांची लागवड करता येणे शक्य असल्याचे मत व्यक्त केले आहे. अशा झाडांचा उपयोग करून उत्तर प्रदेशात एक कागदाचा कारखाना व केरळात एक लगद्याचा कारखाना काढण्याची शक्यता त्यांनी बोलून दाखविली.

**धरणीकंपग्रस्त ताश्कंद**—गेल्या काही दिवसांत रशिया-तील ताश्कंद शहराला वारंवार धरणीकंपाचे धक्के बसले आणि इमारतींची पडझड व प्राणहानी झाली. ताश्कंदच्या १० लाखाच्या लोकसंख्येपैकी ३० हजार नागरिक गांव सोडून गेले आहेत. तथापि, शहरांतील हानी भरून काढण्यासाठी हजारो बांधकाम कामगार आणि एंजिनिअर्स नव्याने शहरांत आले आहेत. ताश्कंद ही उझबेकिस्तानची राजधानी आहे.

**सिकिअँग विभागांत अणुविषयक कारखाने**—सिकिअँग भागाच्या पश्चिमेकडील बाजूला चीनने अणुशक्तीचा विकास करण्यासाठी लागणारे कांही कारखाने उभारले आहेत. हा भाग युरेनियम, कोळसा, लोखंड आणि इतर महत्त्वाची खनिजे ह्यांनी समृद्ध आहे. शिवाय त्यांतील कांही प्रदेश ओसाड वालुकामय आहे. त्यामुळे आण्विक अस्त्रांची चाचणी करण्यास तो उपयुक्त आहे. चीनच्या अणुशक्ती कार्यक्रमांत ह्या भागाला महत्त्वाचे स्थान आहे.

**युद्धकालीन प्रचारकाचे निधन**—दुसऱ्या महायुद्धात बर्लिनच्या रेडिओवरून जर्मनीच्या बाजूने प्रचार करणारा ब्रिटिश निवेदक कॅप्टन नॉर्मन बॅली-स्टुअर्ट हा डब्लिनमधील रस्त्यावरून जात असता एकाएकी खाली पडला आणि क्षणार्धात गतप्राण झाला. त्याचे वय ५७ होते. युद्धानंतर त्याला पकडण्यात येऊन तुरुंगात ठेवण्यात आले होते. १९४९ सालात त्याची सुटका झाली. तेव्हापासून तो एकाकी राहात असे.

### जगाची लोकसंख्या ३२० कोटींपर्यंत पोचली

संयुक्त राष्ट्रसंघटनेचे १९६५ सालचे आकडेवार माहिती देणारे वार्षिक प्रसिद्ध करण्यात आले आहे. वार्षिकात नेहमीप्रमाणे जगातील लोकसंख्येविषयी आणि इतर काही बाबींसंबंधी तपशीलवार माहिती देण्यात आली आहे. सध्या जगाची लोकसंख्या ३२० कोटींपर्यंत पोचलेली असून तिची वाढही वेगाने होत आहे. १९६० ते १९६४ ह्या कालात दरसाल होणाऱ्या लोकसंख्येची टक्केवारी १·८ इतकी होती. चीनची लोकसंख्या सर्वात अधिक वेगाने वाढून ६९ कोटींच्या घरात गेली. त्याच्या खालोखाल भारताची लोकसंख्या ४७ कोटींपर्यंत आली. रशियाची लोकसंख्या २२·८ कोटींपर्यंत आणि अमेरिकेची १९·२ कोटींपर्यंत पोचली. आशिया खंडाचा लोकसंख्येच्या बाबतीत पहिला अनुक्रम लागतो. ह्या खंडातील लोकसंख्या १७८ कोटी झालेली आहे. उत्तर अमेरिकेची २१·१कोटी आहे. दक्षिण अमेरिकेची २३·७ कोटी, युरोपची ४४·१ कोटी आणि ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड इत्यादी भागांतील १·७१ कोटी आहे. १९६४साली जगातील सिगारेट्सचे उत्पादन २,१२,००० कोटी झाले. अर्थातच त्या सर्व खपल्या. रशिआंतील लोकांमध्ये सिनेमा पाहण्याचे व पुस्तके वाचण्याचे वेड मोठ्या प्रमाणावर पसरलेले आहे. अमेरिकन लोकांना मोटारगाड्यांतून हिंडण्याची हौस फार आहे. स्वीडनमध्ये पोलादाचा उपयोग इतर देशांच्या मानाने सर्वात अधिक आहे. ब्रिटनमध्ये वृत्तपत्राचा दरडोई प्रसार सर्वांत अधिक आहे. १९६४ साल अखेर जगातील टेलिफोन्सची संख्या १८ कोटी, २५ लाख इतकी होती. सध्याच्या जागतिक अन्नटंचाईच्या दृष्टीने आणखी एका बाबीची आकडेवारी उद्बोधक आहे. १९६४ साली ६ कोटी, १६ लाख मेट्रिक टन वजनाचे मासे पकडण्यात आले.

### द्रव पेट्रोलच्या जळणाचा पुरवठा

गुजरातमधील तेलशुद्धी कारखान्यात द्रव पेट्रोलच्या इंधनाच्या टाक्या भरण्याची यंत्रसामग्री उभारण्यात आली आहे. ह्या जळणाचा घरगुती उपयोग अलीकडे खूपच वाढत चाललेला आहे. जुलै अखेर ह्या टाक्या बाजारात विक्रीसाठी धाडण्यात येणार आहेत. कारखान्यात दररोज ३० टन द्रव पेट्रोल २,१०० टाक्यांतून भरण्यात येईल. बडोदा शहराला ह्या इंधनाचा पुरवठा प्रथम करण्यात येईल. मोठ्या शहरांतून स्वयंपाकासाठी द्रवरूप पेट्रोलचा वापर करण्याचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. पण सध्या तरी हे जळण पुरविण्याचे काम परदेशी मालकीच्या कंपन्या करीत आहेत. खुद्द भारतात ते उपलब्ध होऊ लागल्यावर त्यांची किंमत उतरेल अशी अपेक्षा करण्यात येत आहे. कलकत्त्यात इंडियन ऑइल कंपनीने हे जळण पुरविण्यास प्रारंभ केला आहे.

### कच्छच्या छोट्या रणाचा कायापालट

कच्छच्या छोट्या रणाचा कायापालट करून त्यात अन्नधान्य पिकविण्याची शक्यता अजमावण्यासाठी रणाची पाहणी करण्यात येत आहे. आतापर्यंत ह्या बाबतीत करण्यात आलेले संशोधन उत्तेजक आहे. रणाची ह्या दृष्टीने सर्वांगीण पाहणी करण्यासाठी तज्ज्ञांची एक तुकडी तेथे अलीकडे गेली होती. संयुक्तराष्ट्र संघटनेच्या पुरस्काराने ह्या भागासाठी एक सुधार योजना आखण्यात आली आहे. योजनेसाठी २० लाखांची तरतूद करण्यात आली असून आणखी २५ लाख रुपये उपलब्ध होण्याचीही शक्यता आहे. ओसाड व रुक्ष असलेल्या ह्या प्रदेशात अन्नधान्य पिकविण्यात यश आले तर खुद्द त्या भागाचा कायापालट तर होईलच; पण त्याचबरोबर गुजरात राज्याची धान्य टंचाई भरून निघण्यासही मदत होईल.

### परदीप बंदराचे काम पूर्ण होत आले

ओरिसाच्या पूर्व किनाऱ्यावर असलेले परदीप हे बंदर मोठ्या बोटींसाठी वापरता यावे म्हणून त्याचा विकास करण्याचे काम चालू होते. हे काम आता पूर्ण होत आले असून बंदराचा वापर येत्या ऑक्टोबर महिन्यापासून चालू होईल. हे बंदर भारतामधील मोठ्या बंदरांपैकी ८ व्या क्रमांकाचे आहे. पूर्व किनाऱ्यावर भर समुद्रावर वसलेले हे ४ थे बंदर असून त्याची किमान खोली ४२ फूट आहे. बंदराच्या विकासाचा पहिला टप्पा पूर्ण करण्यास २०·५ कोटी रुपये खर्च करावे लागले. बंदराच्या परिसरातील पाण्यामधील गाळ काढणे, बोटी येण्यासाठी वाट ठेवणे आणि ह्या वाटेवर लाटांच्या धडका बसू नयेत म्हणून बंधारे घालणे, ही कामे प्रामुख्याने करावी लागली. बंदरातून मुख्यतः लोखंडाच्या खनिजाची निर्यात जपानला करण्यात यावयाची आहे. खनिज बोटींवर पाठविण्यासाठी बसविलेली यंत्रसामग्री दर तासाला २ हजार टन खनिज बोटीच्या पोटात ढकलू शकेल.


## अल्प बचत करणारांसाठी नव्या वर्षाचा प्रस्ताव

सेव्हिंग्ज बँक ठेवींवरील व्याजाचा दर वाढवून ४·१२% करण्यात आला.

**सेव्हिंग्ज बँक नियमातही सुधारणा.**

१. पूर्व सूचनेशिवाय कितीही रक्कम काढता येते.
२. प्रत्येक आठवड्यात दोनदा रक्कम काढण्याची सवलत.
३. फक्त रु. १० च्या ठेवीने सेव्हिंग्ज बँक खाते उघडता येते.

*आमच्या बँकेत तुमची बचत वाढत जाऊं द्या.*

## * दि बेळगांव बँक लिमिटेड *

स्थापना : १९३० ] रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव. [ शेड्यूल्ड बँक

म्हैसूर, महाराष्ट्र व गोवा येथें ३८ शाखांचा विस्तार

कोणत्याही कचेरीत चौकशी करा.

# अर्थ

बुधवार, १५ जून, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रुपयाच्या अवमूल्यनाचे अर्थशास्त्र

भारत इंटर नॅशनल मोनेटरी फंडाचा (आंतरराष्ट्रीय द्रव्य-निधीचा) सभासद आहे. ह्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या नियमाप्रमाणे प्रत्येक देशाला आपल्या चलनाचे मूल्य सोन्यात निश्चित करावे लागते. हे निश्चित केलेले मूल्य 'सममूल्य' किंवा "पार-व्हॅल्यू' सोन्याच्या वजनांत सांगितले जाते. आंतरराष्ट्रीय चलन अस्तित्वात नसल्यामुळे सोन्याला जागतिक चलनाचे स्थान प्राप्त झालेले आहे. आपल्या देशाच्या चलनाची सोन्यातील किंमत ठरविल्यानंतर सभासद देशांतील देणी-घेणी त्या आधारावरच भागवावयाची असतात. कोणत्याही देशाला स्वतःच्या चलनाची ही किंमत समतोलाचा अभाव नाहीसा करण्यासाठी बदलता येते. त्याप्रमाणे भारताने १०० रुपयांना १८·६६ ग्रॅम्सऐवजी ११·८५ ग्रॅम्स अशी दुरुस्ती केली आहे. ह्याला इंटर नॅशनल मोनेटरी फंडाने मान्यता दिली आहे.

रुपयाची अशा रीतीने ३६·५टक्के किंमत कमी केल्याचा परिणाम म्हणून पूर्वी एक डॉलर मिळवायला ४·७६ रुपये लागत, त्याऐवजी आता ७·५ रुपये लागणार आहेत. एक पौंड मिळवायला १३·३३ रुपये लागत, ते आता २१ रुपये लागतील. एक रुबल मिळवायला ५·२१ रुपये लागत, ते आता ८·३३ रुपये लागतील. रुपयाचे हे अवमूल्यन जाहीर करण्यात आले.

रुपयाची किंमत ३६·५ ने कमी केली. पण डॉलर, पौंड व रुबल ही चलने ३६·५ टक्क्यानेच महाग न होता ५७ टक्क्याने महाग झाली आहेत, असे आढळून येईल. एक उदाहरण घेऊन त्याचे स्पष्टीकरण करतो. समजा, एक गवळी १०० शेर दूध घालतो आणि त्याच्या मोबदल्यात कडब्याच्या १०० पेंड्या घेतो. त्याने दुधात पाणी मिसळण्यास प्रारंभ केला; शेरात पावशेर पाणी ह्याप्रमाणे ते प्रमाण आढळून येऊ लागले. ह्याचा अर्थ, त्याने जरी १०० शेर दूध घातले, तरी कडबेवाल्याला पूर्वीच्या कसाचे ७५ शेरच दूध मिळू लागले. तो आता १०० पेंड्या देण्यास तयार होईना; तो ७५ च पेंड्या देऊ लागला. गवळ्याच्या म्हशींना तर १०० पेंड्या हव्यात आणि गवळी दुधांतील पाणी कमी करण्यास तयार नाही. ह्या १०० पेंड्या मिळविण्यासाठी त्याला आता पाणी मिश्रीत किती शेर दूध द्यावे लागेल, ते पाहू या.

७५ पेंड्यांना जर १०० शेर दूध (पाणीमिश्रित) तर १०० पेंड्यांना किती ? $\frac{१००\times१००}{७५}$ = १३३·३ शेर पाणीमिश्रित दूध असा हिशोब होतो. म्हणजे दुधाचे अवमूल्यन २५ टक्के केले, तर पेंड्या ३३·३ टक्के महाग झाल्या.

ह्याच पद्धतीने, डॉलरच्या नव्या किमतीचा हिशेब करू या. रुपयाची सोन्यांत व्यक्त केलेली किंमत ३६·५ टक्क्यांनी कमी झाली, म्हणजे ती पूर्वीच्या मानाने ६३·५ टक्के उरली. अर्थात पूर्वी ४·७६ रुपयांना एक डॉलर मिळावयाचा, तो आता अवमूल्यन झालेल्या ४·७६ रुपयांना मिळणार नाही; एक डॉलरच्या ६३·५ टक्के एवढाच भाग म्हणजे ६३·५ सेंट मिळणार. ६३·५ सेंट म्हणजे (म्हणजे एक डॉलर) साठी जर ४·७६ रुपये (आता अवमूल्यन केलेले) तर १०० सेंटला (म्हणजे एका डॉलरला) किती ? $\frac{४·७६\times१००}{६३·५}$ हे गणित सोडवले असता ७·५ असे उत्तर येते. म्हणजे, १ डॉलर मिळण्यास आता ७·५ द्यावे लागतील. ह्याच पद्धतीत पौंडाचे व रुबलचे गणित सोडविता येईल.

पंचवार्षिक योजनामुळे मालाच्या आयातीत वाढ होत गेली आणि त्याची किंमत देण्याकरिता लागणाऱ्या परदेशी चलनाची कमाई पुरेशा प्रमाणांत होत नव्हती. अशा रीतीने परदेशांतील देणें वाढत चाललें. दरसाल शेकडो कोटि रुपयांची प्रतिकूल तफावत कमी होण्याची चिन्हे दिसेनात. भारताने परदेशांत उभारलेल्या कर्जांची परतफेड, व्याज, इत्यादींसाठी परदेशांतच रकमा उभ्या करायला पाहिजेत. पण रोजचे देणे भागविण्याचीच जेथे पंचाईत, तेथे कर्जफेड आणि व्याज ही कुठून देणार ? परदेशातील आपल्या शिलका एकेकाळी एवढ्या प्रचंड होत्या, की त्या कशा संपवावयाच्या, अशी भारत सरकारला काळजी पडली होती. आता त्या रसातळाला गेलेल्या आहेत; कर्जे काढूनच शिलकांची निर्मिती करण्यात येत आहे. अशा रीतीने, परदेशांचे देणे भागविण्यास आपण असमर्थ झालो आहो, मग, आयात चालू कशी ठेवावयाची ? जरुरीच्या जिनसा परदेशातून कशा मिळवावयाच्या ? हा प्रश्न उपस्थित झाला. जेव्हा परदेशाचे देणे व येणे ह्यांत एकवाक्यता असते, त्या वेळी हिंदी व परदेशी चलन ह्यांची एकमेकाशी मैत्री, बरोबरीच्या नात्याने टिकूं शकते. पण आपल्याला अमेरिकेतील देणी देण्यासाठी डॉलर्स हवेत. अमेरिकेला भारतात देणी देण्यासाठी रुपयांची आवश्यकता नाही. अशामुळे आम्ही डॉलर मिळविण्यासाठी जास्त रुपये देऊ करू लागलो. एका डॉलरला कायद्याप्रमाणे ४·७६ रुपये पडावयाचे, पण १० ते १५ रुपये देऊनहि डॉलर मिळेनासे झाले. तशीच गोष्ट पौंडाची.

सरकार मात्र जुन्या हुंडणावळीच्या दराला चिकटून बसले. व्यापारी लोक बेकायदा जास्त रुपये देऊन चोरून डॉलर्स मिळवू लागले आणि त्याच्या किमतींत चोरून माल आणून बाजारात विकू लागले. निर्यात करणारे लोक १ कोटी रुपयांची किंमत सरकारला ७५ लक्ष रुपये दाखवून, उरलेले २५ लक्ष रु. अमेरिकेत डॉलर खरेदीसाठी आणि चोरट्या व्यापारासाठी वापरू लागले. याउलट आयात करणारे लोक १ कोटी रुपयांची किंमत १ कोटी, २५ लक्ष रु. दाखवून सरकारकडून २५ लक्ष रु. चे परदेशी चलन लबाडीने मिळवू लागले. भ्रष्टाचार इतके वाढले, की भ्रष्टाचार हाच व्यापाराचा लोकमान्य मार्ग बनला. हळूहळू गेली १५ वर्षे, परिस्थिति बिघडत चालली आहे, पण ते कबूल करण्यास सरकार तयार नव्हते. आता अमेरिकन सरकार, इंटरनॅशनल मोनेटरी फंड आणि जागतिक बँक ह्यांचा फाटलेली झोळी शिवण्याचा 'सल्ला' भिक्षेकरी भारत सरकारला ऐकणे भाग पडले आहे. नाहीतर सरकारने ही परिस्थिती आणखी झाकून ठेवण्याचा प्रयत्न केला असता. सावकारांनी

नाक दाबल्यामुळेच सरकारला ही दिवाळखोरी कबूल करावी लागली. रुपयाची परदेशी बाजारात पत उरली नव्हती; ती परिस्थिती सरकारने आता मान्य करून स्वतःच्या रुपयाच्या किमतीचे अवमूल्यन जाहीर केले आहे. नव्या दरामुळे भारताची आयात कमी होईल, निर्यात वाढेल, आर्थिक स्थिती सुधारेल ही अपेक्षा. आपले कुळ जिवंत ठेवण्यात सावकाराचाहि स्वार्थ असतो. तसेच येथे घडले.

एखाद्या मधुमेहाच्या रोग्याच्या करंगळीला गळू झालेले असावे आणि कुडमुड्या वैद्याच्या अपात्रतेमुळे तो रोग मांडीपर्यंत जाऊन तेथपर्यंतचा पाय कापून टाकावा लागावा, तसे येथे घडले आहे. आर्थिक दुःस्थितीवर वेळीच योग्य उपाय योजिले असते, तर अवमूल्यनाचा प्रसंगच उद्भवला नसता. ह्यापूर्वीच आपण परदेशी मदत घेणे बंद केले असते, आयात थांबविली असती, निर्यात वाढविली असती, देश स्वावलंबी केला असता, तर आपल्या रुपयाचा मान राहिला असता. अवमूल्यनाची गरज निर्माण होईपर्यंत सरकारने दिरंगाई केली, ह्याचे कारण उपाययोजना अमलात आणण्याचे सरकारला आवश्यक ते धारिष्ट, सत्तारूढ पक्षाच्या स्वार्थाच्या दृष्टीने, परवडणारे नव्हते. जनतेला अधिक कष्ट करायला लावण्यापेक्षा, कर्जे आणि भिक्षा ह्यामार्गे तिला भ्रमात ठेवणे, सत्ता कायम ठेवण्याच्या दृष्टीने त्यांना सोईचे होते. राज्यकर्ते तात्कालिक सोय करणे पसंत करीत; दूरदृष्टीने विचार करण्याची त्यांची तयारीच नव्हती. दिवाळे काढणाऱ्या माणसाला जो निर्लज्जपणा लागतो, तोच राज्यकर्त्यांना आता दाखवावा लागला आहे; त्यात भूषणास्पद असे काहीही नाही.

ज्या आयातीला १ कोटी रु. लागत, तेथे आता १ कोटी ५७ लक्ष रु. लागतील. साहजिकच, आयातीस आपोआपच बराचसा आळा बसेल. जो माल आयात होईल, तो त्या मानाने महाग होईल. निर्यातीच्या बाबतीत उलट परिणाम घडून येईल. पूर्वी ज्या निर्यातीमुळे १ कोटी रु. ची प्राप्ती व्हावयाची, ती आता १ कोटी, ५७ लक्ष रु. ची होईल. म्हणजे, निर्यातीला उत्तेजन मिळेल. आवश्यक त्या आयातीच्या किंमती भरमसाट वाढू नयेत आणि निर्यातही नियंत्रित व्हावी, ह्यासाठी आयात व निर्यात करांची तारतम्याने योजना करावी लागेल. चोरट्या आयातीस थोडाफार आळा बसेल. परदेशी चलनाची मागणी कमी होऊन रुपयास जास्त मागणी येऊ लागेल.

तत्त्वतः हे सर्व ठीक आहे. पण, आयात अत्यंत महाग करूनही ती कमी करता येणे सोपे नाही. कारण, पुष्कळशा उद्योगधंद्यांचे उत्पादन आयात मालावर अवलंबून आहे; ते उत्पादन तर टिकवले पाहिजे; वाढविले पाहिजे. निर्यातही एकदम जादूसारखी वाढणार नाही. उदाहरणार्थ, चहाची लागवड क्षणात होऊ शकत नाही, चहाची झाडे क्षणात वाढत नाहीत. तीच गोष्ट तागाची. कारखान्यात एका पाळीऐवजी तीन पाळ्या करून, यंत्रे वाढवून, उत्पादन जसे वाढविता येते, तसे आपल्या बहुसंख्य निर्यातीच्या जिनसांच्या बाबतीत शक्य नाही.

महागाई वाढणे अपरिहार्य आहे. कारण मालाचा एकूण पुरवठा कमी होणार. ज्या जिनसा आज मिळतात, त्या कमी प्रमाणात मिळू लागणार म्हणजे किमती वाढणे, त्या पाठोपाठ, नव्हे त्याआधीच, आलेच. सरकार त्यासाठी कोणती नियंत्रणे बसविते व अमलात आणते, त्यावर सर्व काही अवलंबून आहे.

रुपयाच्या अवमूल्यनाचा आणि येथील चलनवाढीचा प्रत्यक्ष संबंध नाही. पण अवमूल्यन करण्यामध्ये सरकारने जी जागृती दाखविली आहे ती चलनवाढ रोखण्यासाठीही त्याने दाखविली, तर चलनवाढ थांबू शकेल. गेल्याच वर्षी सरकारने ४०० कोटी रु. ची चलनवाढ केली, म्हणजे तितक्या नोटा छापून घेऊन आपली देणी भागविण्यासाठी उपयोगात आणिल्या ! ही सवय एकाएकी सुटणे शक्य नाही. आधीच महागाईने बेजार झालेल्या जनतेवर प्रचंड कर बसवून चलन परत खेचून घेणे सरकारला कितपत जमेल? पुंजीपतींच्या जवळचे काळ्या बाजारातील हजारो कोटी रुपयांचे चलन जप्त करता येईल का? चलनवाढ आटोक्यात आणण्यासाठी अत्यंत जालीम उपायांचा अवलंब करावा लागेल.

उपायांची चर्चा नेहमी ऐकू येते, पण दुखणे नेमके कोणते आहे? आपण सर्वजण (म्हणजे आपला देश) आपण जेवढे उत्पादन करतो, त्यापेक्षा ज्यास्त खात आहो; सुखसोई उपभोगीत आहो. तेव्हा ह्या गरजा कमी करून आणि शेतीचे व कारखान्यांचे उत्पादन वाढवून स्वावलंबी व्हायला हवे; तेही शक्य तितक्या लवकर. म्हणजे मग कर्जफेडीची काहीतरी शक्यता. एकाद्या जमीनदाराने कर्जे काढून आरामात राहावे, पुढे कर्जफेडीसाठी रोज नव्या नव्या प्रॉमिसरी नोटा लिहित जावे, कालांतराने कोर्टाचे हुकुमनामे येण्यास प्रारंभ व्हावा आणि त्याच्या पुढील पिढीला खाण्याची भ्रांत पडावी; इकडे जमिनदारांच्या कारकुनांनी मात्र इस्टेटी कराव्या, तशी आजची आपल्या देशाची परिस्थिती झाली आहे.

परिस्थिति खूपच गंभीर वाटते. यापुढील परिस्थिती कल्पना करता येणार नाही, एवढी बिकट होईल. देशाचा कारभार संधिसाधू लोकांच्या हाती न राहता दूरदर्शी, निष्ठावंत अशा तज्ज्ञांच्या हातीं आला आणि जनतेला अप्रिय असे निर्णय करण्याचे सामर्थ्य त्यांना लाभले, शास्त्रज्ञ व इतर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाला वाव मिळाला, तरच तरणोपाय आहे. आपल्या देशाची आर्थिक नापत आता जगजाहीर झाली आहे, ही एक इष्टापत्तीच होय. कारण, ह्यापुढे परराष्ट्रीय कर्जे व मदत ही कठीण होऊन बसतील आणि आपोआपच आपणास आपल्यापुढील प्रश्नांची जाणीव होईल. समाजातील आर्थिक विषमता दूर होणे, ही नव्या कार्यक्रमात अग्रस्थानाची बाब होईल आणि सर्वांत महत्त्वाचा म्हणजे लोकसंख्येचा प्रश्न तातडीने हाती घ्यावा लागेल. ह्या सबंध विवेचनातून लोकसंख्येचा प्रश्न वगळताच येणार नाही. पण, तिकडे तर कुणीच लक्ष देत नाही.

रुपयाच्या अवमूलनामुळे भारताची सबंध जगात नाचक्की झाली आहे; प्रतिष्ठा नष्ट झाली आहे. सर्वांना जे माहीत होते, ते आता स्पष्ट झाले आहे. भिक्षा मागतानाही आपण उर्मटपणा करीत होतो; तो यापुढे करता येणार नाही. आपल्या कपाळावर नादारीचा शिक्का बसला आहे. परंतु नादार मनुष्यही पुनः जम बसवून उत्कर्ष घडवून आणू शकतो; आपल्या देशालाही ते शक्य आहे. आर्थिक दुर्बलतेमुळे लष्करी व राजकीय दुर्बलता प्राप्त होते; पण नेटाने प्रयत्न करणारे देश काय चमत्कार घडवून आणू शकतात, हे जर्मनी, रशिया, चीन, जपान, ह्यानी दाखवून दिली आहे. आपल्या अर्थमंत्र्यांनी युगोस्लाव्हिया व फ्रान्स यांचा आवर्जून निर्देश केला आहे. अर्थात त्या देशासारखेच जिद्दीचे कणखर सरकार हवे, राष्ट्रनिष्ठ जनतेचे सहकार्य हवे. तसे झाले तर अवमूल्यनाचे उद्दिष्ट सफल होईल. तेव्हा, आर्थिक प्रश्नाचे उत्तर आर्थिक उपायाच्या कागदी योजनात आढळणार नाही; माणसांच्या कर्तृत्वातच ते आढळेल. हे आव्हान सरकार इतकेच नागरिकांनीही स्वीकारावयाचे आहे. लोकशाहीत तर जनतेच्या जागरूकतेला आणि विवेकाला विशेष महत्त्व आहे. अवमूल्यनामुळे जनतेला बसलेला हादरा नैराश्य निर्माण न करता कृतीला चालना देवो !

### उष्णतेवर विद्युदुत्पादन करणारे नवे केंद्र

महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे आणखी एक वीजकेंद्र मराठवाड्यात पारली येथे उभारण्यात यावयाचे आहे. उष्णतेच्या साह्याने वीज उत्पन्न करणाऱ्या ह्या केंद्राचा पायाभरणी समारंभ गेल्या महिन्यात करण्यात आला. ह्या केंद्रात ६० मेगॅवॅट विजेचे उत्पादन करण्यात येणार आहे. केंद्रासाठी लागणाऱ्या मुलकी बांधकामास पावसाळा संपल्यावर प्रारंभ करण्यात येणार असून केंद्रातील विद्युदुत्पादनाचे काम १९६८ अखेर सुरू होईल असा अंदाज आहे. केंद्रासाठी १०·५ कोटी रुपये खर्च येणार असून त्यापैकी ७·५ कोटी रुपये यंत्रसामग्री व उपकरणे ह्यांवर खर्च करावे लागतील. जमीन व मुलकी इमारती ह्यांच्यासाठी २ कोटी रुपये लागतील आणि ०·३ कोटी रुपये वीजवाहक तारा टाकून त्या मध्यवर्ती वीजपुरवठा व्यवस्थेत अंतर्भूत करण्यासाठी लागतील. हे केंद्र विदर्भ वीजपुरवठ्याशी आणि कोयना वीजपुरवठ्याशी जोडण्यात येईल. त्यामुळे ह्या भागातील वीजपुरवठा निश्चित स्वरूपाचा होण्यास मदत होईल. मराठवाड्यातील ह्या केंद्राचे बांधकाम सुरू झाल्यावर १ हजार लोकांना रोजगार उपलब्ध होईल. पूर्णा नदीवरील जलविद्युत्‌केंद्र आणि हे केंद्र चालू झाल्यावर मराठवाड्यातील अनेक छोट्या शहरांना व गावांना विजेचा पुरवठा करण्यात येऊ लागल्यावर त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास चांगला हातभार लागेल. कारण, त्यामुळे शेतीचे आणि उद्योगधंद्यांचे उत्पादन वाढविण्यास चांगली संधि उपलब्ध होते. जास्तीत जास्त खेड्यांना वीजपुरवठा करण्याची मंडळाची खटपट आहे. तथापि, ग्रामीण जनता ह्या नव्या संधीचा उपयोग करून घेण्यास कितपत उत्सुक आहे ह्यावरही यशापयश अवलंबून आहे.

---

### लष्करी मदतीची तरफदारी

भारत व पाकिस्तान ह्यांच्यात गेल्या वर्षी झालेल्या सशस्त्र संघर्षापासून अमेरिकेत पाकिस्तानला देण्यात आलेल्या अगर पुढे यावयाच्या लष्करी मदतीबद्दल वादंग माजून राहिले आहे. पाकिस्तानने भारताविरुद्ध अमेरिकेने दिलेली शस्त्रास्त्रे वापरल्यामुळे अमेरिकेतील काही गट लष्करी मदत देण्याविरुद्ध टीका करीत आहेत. कारण, ही मदत मुळात कम्युनिस्ट देशांच्या लष्करी आक्रमणाविरुद्ध वापरण्यासाठी देण्यात आलेली होती. अमेरिकेचे संरक्षण-चिटणीस मि. मॅक्नामारा ह्यांनी अमेरिकन प्रतिनिधिगृहाला पाठविलेल्या एका निवेदनात पाकिस्तानला बिगरसंहारक युद्धसामग्री देण्याचे समर्थन केले आहे. ते म्हणतात, की पाकिस्तान हा देश सेंटो आणि सिएटो ह्या लष्करी करारांचा सभासद आहे. शिवाय त्याचा विस्तार व भौगोलिक स्थान अशी आहेत, की पाकिस्तानला दिलेली लष्करी मदत अमेरिकेच्या हिताचे वर्धन करणारीच ठरेल. अमेरिकेच्या लष्करी खात्यानेही प्रतिनिधीगृहाला एक निवेदन पाठविले आहे. गेल्या साली झालेल्या भारत–पाक संघर्षात अमेरिकेच्या पॅटन रणगाड्यांपेक्षा ब्रिटनचे सेंच्युरिअन रणगाडे अधिक प्रभावी ठरले असा निष्कर्ष काही ब्रिटिश निरीक्षकांनी काढला होता. ह्या टीकेला वरील निवेदनात उत्तर देण्यात आले आहे. निवेदनात असे म्हटले आहे, की भारत-पाक संघर्षात झालेल्या चिलखती दलांच्या संग्रामात नेमके काय घडले ते अजूनही स्पष्ट झालेले नाही. अशा प्रकारच्या चिलखती दलांच्या झटापटीत अनेक अज्ञात कारणांचा प्रभाव पडू शकतो. चिलखती दले कोणत्या रीतीने वापरण्यात आली, ती वापरणाऱ्या सैनिकांचे प्रशिक्षण कितपत कसोशीने झालेले होते आणि चकमकी झालेल्या रणांगणाचे स्वरूप काय होते इत्यादी अनेक बाबी विचारात घ्याव्या लागतील.

### पूर्व पाकिस्तानात अयूबखान राजवटीला विरोध

पूर्व पाकिस्तानात पाकिस्तानच्या अयूब राजवटीविरुद्ध लोकांची चळवळ फोफावण्याची लक्षणे दिसत आहेत. अवामी लीग ह्या राजकीय संघटनेने ह्या बाबतीत पुढाकार घेतलेला आहे. संघटनेच्या अध्यक्षांना अटक होण्यापूर्वी त्यांनी आपला ६ कलमी कार्यक्रम प्रसृत केलेला आहे:—(१) वयात आलेल्या सर्वांना मताधिकार देऊन कायदेमंडळाच्या प्रत्यक्ष निवडणुका घ्याव्यात. (२) संरक्षण आणि परराष्ट्रीय संबंध सोडून बाकीची खाती पूर्व पाकिस्तानाकडे सोपविण्यात यावीत. (३) पाकिस्तानच्या दोन भागांत दोन स्वतंत्र चलने ठेवावी आणि त्यांचा बदला खुला असावा. (४) पाकिस्तानच्या मध्यवर्ती सरकारने कर बसविण्याची व तो गोळा करण्याची सत्ता सोडून द्यावी (५) परदेशीय चलनाच्या प्राप्तीची दोन स्वतंत्र खाती उघडण्यात यावीत आणि (६) पूर्व पाकिस्तानसाठी स्वतंत्र लष्करी अगर निमलष्करी संघटना उभारण्यात यावी.

---

### संयुक्त अरब प्रजासत्ताकांत तांदुळ नाही

जगातील १७८ कोटी लोक आशिया खंडांत पसरलेले आहेत आणि त्यांच्या आहारांत तांदुळाला प्राधान्य आहे. परंतु जगातील तांदुळाचे उत्पादन गरज भागविण्याइतके होत नाही. त्यामुळे भारतासारख्या देशात तांदुळाची टंचाई नेहमीच असते. गेल्या वर्षीच्या अवर्षणामुळे टंचाईने तीव्र स्वरूप धारण केले हे मात्र खरे. संयुक्त-अरब प्रजासत्ताकाचे अध्यक्ष नासर ह्यांनी गेल्या एप्रिलमध्ये असे जाहीर केले की एप्रिल व मे महिन्यांत तांदुळ देण्यात येणार नाही. परंतु आता ही तांदूळबंदी आणखीही कांही महिन्यांनी वाढविण्यांत येणार आहे. अरब लोकांचे मुख्य खाणे गव्हाचे आहे आणि त्यांतील ५० टक्के गहू अमेरिकेने पी. एल. ४८० कराराप्रमाणे पुरविलेला असतो. इजिप्तमध्ये कांही थोडासा तांदूळ पिकविण्यात येतो. पण, परदेशीय चलन मिळविण्यासाठी तो निर्यात करण्यात येतो तांदुळाच्या टंचाईला एकटा भारतच तोंड देत आहे, असे मानण्याचे कारण नाही.

---


D. E. Society's

## Brihan Maharashtra College of Commerce, Poona 4.

The College will re-open on 20th June 1966 for the academic year 1966–67. Students seeking admission to Pre-Degree, B. Com. Part I, S. Y., T. Y., B. Com. classes should apply immediately. Forms of admission and copies of the prospectus are available in the College Office between 11 a. m. and 2 p. m. on all working days. Provision has been made for teaching Industrial Management and Trede & Transport as special subjects in addition to Advanced Accounting and Auditing, Advanced Cost Accounting, Banking and Statistics. B. A. Students wishing to study for the B. Com. degree should apply immediately after the result is declared.

N. K. Kulkarni
Principal

## अमेरिकेच्या गव्हावरील भरवसा धोक्याचा

गेल्या वर्षी भारतातील बहुतेक भागात अवर्षण झाल्यामुळे अमेरिकेकडून आयात करावयाच्या अन्नधान्यात खूपच वाढ झाली. अमेरिका अन्नधान्याचे कोठार समजले जाते. पण निसर्गाच्या लहरीपासून अमेरिकेची पूर्णपणे सुटका झालेली आहे असे मानण्याचे कारण नाही. जगातील अनेक देशाना अन्नधान्य पुरवावे लागल्यामुळे तेथील साठे कमी होत चाललेच आहेत. पण, खुद्द अमेरिकेतही काही भाग पर्जन्याच्या अभावाच्या तावडीत सापडला आहे. त्यामुळे घरची गरज भागविण्यासाठी परदेशांना पाठवावयाच्या गव्हाच्या पुरवठ्यावर अमेरिकेला नीट लक्ष ठेवावे लागत आहे. अमेरिकेच्या शेती खात्याचे प्रमुख मि. फ्रीमन ह्याविषयी बोलताना म्हणाले की, परदेशांना द्यावयाच्या अन्नधान्याची मदत अमेरिकेला कमी करावी लागण्याची शक्यता आहे. परदेशांना पाठवावयाच्या गव्हात कपात करणे आवश्यक वाटल्यास अमेरिका तसे करीलही. कोणत्याही परिस्थितीत अमेरिकेतील ग्राहकांना तोशीस लागू दिली जाणार नाही. अमेरिकेच्या मध्य–पश्चिम भागात अपुऱ्या पावसामुळे गव्हाच्या पिकाची खराबी झालेली आहे. त्यामुळे भारताला पाठवावयाच्या गव्हात काटछाट करावी लागण्याचा संभव आहे. भारताला अमेरिकेने १ कोटी टन गहू पाठवावा लागेल असे वाटत नाही. अर्थात भारतात चालू वर्षी नेहमीप्रमाणे पाऊस पडला पाहिजे. चालू वर्षी वेळेवर पुरेसा पाऊस पडल्यास भारताला ४० लाख टन कमी गव्हाची गरज लागेल. मि. फ्रीमन ह्यांच्या ह्या वक्तव्यावरून अमेरिकेकडून येणाऱ्या अन्नधान्याची मदत गृहीत धरून चालणार नाही. हे आणखी एका दृष्टीने स्पष्ट झाले आहे. पावसापाण्याच्या नैसर्गिक नियमापासून अमेरिका झाली तरी पूर्ण मुक्त नाहीच.

## स्वस्त आणि अधिक उत्पादन हाच एकमेव मार्ग

ऑल इंडिया कॉस्ट कान्फरन्सचे उद्घाटन करताना भारताचे कंट्रोलर आणि ऑडिटर जनरल श्री. ए. के. रॉय ह्यांनी भारताच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीविषयी परखड विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले की, भारतात सध्या पैशाचा सुकाळ आणि वस्तूंचा दुष्काळ अशी परिस्थिती आहे. त्यामुळे उत्पन्न झालेल्या आर्थिक प्रश्नाची सोडवणूक करावयाची असेल तर काही थोड्या पण आरडाओरड करणाऱ्या लोकांच्या खिशात आणखी पैसे पडण्याची सोय करून भागणार नाही. असे प्रयत्न करण्यात आले तर त्यामुळे सध्याची आर्थिक परिस्थिती आणखीच बिघडून जाईल. भारतापुढे असलेले प्रश्न सोडविण्याचा एकच मार्ग आहे; आणि तो म्हणजे स्वस्त व अधिक उत्पादन. देशापुढे एखादे घोषवाक्य ठेवावयाचे असले तर "उत्पादन करा, नाही तर नष्ट व्हा" हेच ते असले पाहिजे. उत्पादन विस्कळितपणाने करून चालणार नाही. देशातील माणूसबळाचा आणि उत्पादक साधनांचा अधिकात अधिक योग्य रीतीने वापर करण्यात आला पाहिजे. सार्वजनिक मालकीच्या विभागांत सध्या होणाऱ्या उत्पादनात आज नफ्याची अपेक्षित कूस नाही. अशी अपेक्षा ठेवणे योग्य की अयोग्य हा प्रश्न अजिबात वेगळा आहे. त्यामुळे सार्वजनिक मालकीच्या विभागांतील औद्योगिक संघटनांची कार्यक्षमता अजमावताना नफ्यासाठी चालविण्यात येणाऱ्या कसोट्यांचा उपयोग होत नाही. सार्वजनिक मालकीच्या विभागांतील उद्योगधंद्यांची कार्यक्षमता अजमावण्याच्या फक्त दोनच कसोट्या आज सांगता येतील. एक त्यांच्या कारभाराची कार्यक्षमता आणि दुसरी त्यातून उत्पादन करण्यात येणाऱ्या मालाच्या नमुन्याला येणारा उत्पादनाचा खर्च. ह्या दोन्ही कसोट्या वापरून उत्पादनाच्या खर्चाच्या हिशेबनिसाने त्याची परीक्षा केली पाहिजे.


# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — : विभागीय कचेरी :

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई — महाल : नागपूर.

टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४, २५४७८१ — तारेचा पत्ता : फार्मर बँक

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ५,६५,६६,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | १,७५,५५,००० |
| ठेवी | ... रु. | ४३,८६,६३,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,००,८६,८१,००० |

: शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले ( पूर्व ) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम) (१५) सिताबर्डी (१६) धरमपेठ (१७) धन्तोली (१८) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. खु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. — श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.



# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

" चिरमुले निकेतन ", १४३/१४६ भवानी पेठ

सातारा–शहर

*दि. १८–७–६५ पासून ठेवींवरील व्याजांच्या दरांत खालीलप्रमाणे वाढ झालेली आहे.*

## मुदतीच्या ठेवी

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शे. | ६=२५ |
| २ वर्षे | ,, | ६=५० |
| ३ वर्षे | ,, | ६=७५ |
| ५ वर्षे | ,, | ७=२५ |
| ७ वर्षे | ,, | ७=५० |
| ९ वर्षे व जास्त | ,, | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खाते :—दि. १–२–६५ पासून ४ टक्के

*तसेच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दराने स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याही शाखेत अधिक माहिती मिळू शकेल.

### भारतामधील पदवीधरांची पाहणी

कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संघटनेने भारतामधील पदवीधरांची व उच्च शिक्षण घेतलेल्या लोकांची पाहणी करून आकडेवार माहिती गोळा केली आहे. पहाणीत जमा केलेल्या माहितीप्रमाणे भारतामधील पदवीधरांची संख्या १० लाख असून एम. ए. झालेल्यांची संख्या २ लाख, २० हजार आहे. कला विभागातून पदवी घेतलेल्या इतर सुशिक्षितांची संख्या पुढीलप्रमाणे आहे. बी. कॉम, : १,७०,०००; एम्. कॉम. : २२ हजार; एलएल. बी. १ लाख १५० हजार; एलएल. एम : १ हजार; बी. एड. २ लाख; एम. एड. ६ हजार; आणि पीएच. डी. ४ हजार. एम. ए. उत्तीर्ण झालेल्या पैकी ४६ हजार अर्थशास्त्राचे, ३० हजार इतिहासाचे, ३० हजार हिंदीचे, २५ हजार इंग्रजीचे आणि २५ हजार राज्यशास्त्राचे आहेत. १९५० ते १९६० ह्या कालात पी. एचडी. झालेल्यांची संख्या १,९२० होती. त्यांपैकी १,७५८ आर्टसचे, ९८ कॉमर्सचे, ६३ शिक्षणाचे आणि १ कायद्याचा असे होते. ह्याच अवधीत शास्त्रे आणि तंत्रविद्या ह्या विषयांतील पी. एच. डींची संख्या ३,११७ होती. शिक्षण व्यवस्थेत शिक्षकांना शिकवून तयार करण्याचे महत्त्व अलीकडे झपाट्याने पटत चालल्याचे दिसते. शिक्षणक्षेत्रातील पदवीधरांची आणि विशारदांची संख्या वाढत चाललेली आहे. १९४० मध्ये बी. टी. पदवीधरांची संख्या १,६२२ होती. ती १९५० साली ३,१०३ साली आणि १९६३ साली १८,३३८ इतकी झाली. ह्या आकड्यांत बी. एड. झालेल्यांचाही समावेश आहे. १९६६ च्या आरंभी त्यांची संख्या २ लाखांच्या घरात आली असावी असा अंदाज आहे. १९५० ते १९६० ह्या दशकात पीएच. डी. च्या ६३ पदव्या देण्यात आल्या. भारतामधील निरक्षरतेचे व अल्प शिक्षितांचे मोठे प्रमाण लक्षात घेता पदवीधरासारख्या सुशिक्षितांना आपल्याला वाव आहे असे वाटते. पण शिक्षणाचा अर्थव्यवस्थेशी दुवा नसल्यामुळे शिक्षितांना कुचंबणेलाच तोंड द्यावे लागत आहे.

### मध्यप्रदेशातील १ कोटी लोक दुष्काळाच्या छायेत

मध्यप्रदेशातील २७ जिल्ह्यांत दुष्काळी परिस्थितीने उग्र स्वरूप धारण केले आहे. ह्या सर्व जिल्ह्यांत मिळून २८,०६८ खेडी अवर्षणाच्या तडाख्यात सापडलेली आहेत. छत्तीसगड भागात परिस्थिती फारच वाईट आहे. बस्तर भागातही अन्नान्नदशा जाणवत आहे. मध्यप्रदेशातील १ कोटी ग्रामीण जनता दुष्काळाच्या सावलीत वावरत आहे. राज्यात अनेक ठिकाणी दुष्काळी कामे सुरू करण्यात आली असून त्यात ९ लाख लोकांना काम पुरविण्यात आले आहे. जून अगर जुलै महिन्याच्या अखेर दुष्काळग्रस्त लोकांपैकी रोजगारी मागणारांची संख्या आणखी ३ लाखांनी वाढण्याचा संभव आहे. चालू आर्थिक वर्षात ४ कोटी रुपये दुष्काळी कामासाठी खर्च करण्यात यावयाचे आहेत. लहान मुले आणि गरोदर स्त्रिया ह्यांना १३ हजार टन दुधाची भुकटी वाटण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

### पांच पैशांच्या नाण्याला आणा म्हणा

पांच पैशांच्या नाण्याला 'आणा' हे नाव देण्यात यावे, अशी सूचना पुढे आली आहे. ती अमलात आल्यास, रुपयाचे २० आणे होतील.


सरदारगृह


मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्





१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

### हिन्दी एंजिनिअरांना शिक्षण

भारत आणि रशिया ह्यांच्या दरम्यान करण्यात आलेल्या कराराप्रमाणे रशिया भारताला माती उकरून ती हलविण्याची अनेक प्रकारची यंत्रसामग्री पुरविणार आहे. यंत्रसामग्रीची किंमत सुमारे २ कोटी रुपये असून ती रुपयाच्या चलनातच देण्यात यावयाची आहे. ही यंत्रसामग्री आधुनिक असल्यामुळे ती चालविण्याचे आणि सुस्थितीत राखण्याचे काम काहींसे गुंतागुंतीचे आहे. म्हणून हिंदी एंजिनिअरांना यंत्रसामग्रीबद्दलचे शिक्षण देण्याचे रशियाने कबूल केले आहे. ५ हिंदी एंजिनिअर्स हे काम शिकण्यासाठी मास्कोला रवाना झाले आहेत. त्यांचा खर्च रशियाच करणार आहे. ह्या खर्चात येण्याजाण्याच्या प्रवास खर्चाचाही समावेश आहे. यंत्रसामग्री भारी वजनाची आहे.

### निवडणुका लढविण्यासाठी लागणारा पैसा

निरनिराळ्या राज्यांतील काँग्रेस संघटनांना आणि राज्यांच्या मुख्य मंत्र्यांना काँग्रेसचे अध्यक्ष श्री. कामराज ह्यांनी असे सुचविले आहे, की प्रदेश काँग्रेस कमिट्यांनी निवडणुकीसाठी लागणारा पैसा स्थानिक रीत्या गोळा करावा. त्यासाठी काँग्रेसच्या वरिष्ठांकडे हात पसरू नये. लोकांकडून छोट्या देणग्या घेऊन आणि श्रीमंताकडून ऐच्छिक देणग्या घेऊन खर्च भागविण्यात यावा असे त्यांचे म्हणणे आहे. काँग्रेसच्या वरिष्ठांनी निवडणूक-निधी गोळा करून तो वाटण्याची पद्धत १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकांपासून अंशतः बंद करण्यात आली. कारण, त्या वेळी हिंदमधील धनिकांनी देणग्यांच्या बदल्या सरकारकडून आर्थिक सवलती मिळविण्याचा प्रयत्न केला होता. सरकारच्या आर्थिक धोरणावर दबाव आणण्याचे प्रयत्न आजही चालूच आहेत.

### शहरांतील हुल्लडबाज तरुणांचा बेफामपणा

रशिआतील एका हुल्लडबाज तरुणाला रशिअन कोर्टात देहान्ताची शिक्षा फर्मावण्यात आली. ह्या तरुणाने आपल्या हातातील चाकूने दोन माणसांना इजा केली असा आरोप त्याच्यावर करण्यात आलेला होता. रशिआतील वृत्तपत्रांत वयात आलेल्या अपरिपक्व बुद्धीच्या तरुणांनी चालविलेल्या धांगड-धिंग्याबद्दल गेले काही महिने जोरदार विरोध करण्यात येत होता. गेल्या काही वर्षांत रशिआतील तरुणांत गुन्हेगारी वृत्ति आणि नशापाणी करण्याची सवय वाढलेली आढळून येत आहे. पण, ही प्रवृत्ति फक्त रशियातच दिसून येते असे नाही. ब्रिटन, अमेरिका, इत्यादी देशांतील तरुणही बेताल वागताना आढळून येतात. औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या सर्वच देशांतून अवाढव्य शहरांची वाढ होत जाते, आणि त्यामधून बेजबाबदारीने वागणाऱ्या तरुणांची संख्याही फुगत जाते असा अनुभव आहे. मोठ्या शहरांना त्रस्त करणारे अनेक प्रश्न आहेत. त्यांत बेताल तरुणांच्या वागणुकीच्या प्रश्नाची भर पडली आहे.


महाराष्ट्रातील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था

**डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स**

संस्थापक : कै. प्रा. ग. कृ. भोपटकर, एफ्. सी. आय्.
स्थापना : १९१८ ] [ टेलिफोन नं. ५४९६०
७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे १.

जी. सी. डी., डी. कॉम., जी. डी. सी. ॲन्ड ए., सी. ए. आय. आय. बी., ए. आय. सी. डब्ल्यू. ए., भारत सरकारच्या कंपनी सेक्रेटरी परीक्षा, पुणें विद्यापीठाच्या एक्स्टर्नल प्री-डिग्री कॉमर्स, बी. कॉम. व स्पेशल बी. कॉम. डिग्री कोर्स, शॉर्टहँड, इंग्रजी-मराठी टाईपरायटिंग आणि इन्स्टिटयूटचा बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

**२ जुलै, १९६६ पासून संस्थेच्या नवीन अद्ययावत इमारतीत वर्ग सुरू होतील.**

— खास वैशिष्ट्ये —

★ सकाळ-दुपार-संध्याकाळचे वर्ग.
★ इंग्रजी-मराठीतून अध्यापनाची सोय.
★ उद्योगधंद्यात पटू इच्छिणाऱ्यांकरिता सुयशदायी असे व्यापारी अभ्यासक्रम.
★ बँकेत नोकरी करणाऱ्या वा नोकरी करू इच्छिणाऱ्यांसाठी ३ महिन्यांचा बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.
★ बी. कॉम. एक्स्टर्नल डिग्रीच्या चारी वर्षांच्या सर्व विषयांच्या अभ्यासाची संपूर्ण सोय.

माहितीपत्रक २५ पैसे.



**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०२

(१) बचत खाते :—व्याजाचा : दर द. सा. द. शे. रु. ४=००
(२) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध
(३) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

*अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर



दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## क्रिकेटच्या सामन्यांना अवमूल्यनाचा फटका

भारत सरकारने केलेल्या रुपयाच्या अवमूल्यनाचा फटका भारतात क्रिकेटचे सामने खेळण्यासाठी येणाऱ्या वेस्ट इंडीज संघाच्या दौऱ्यालाही बसणार आहे. वेस्ट इंडीज संघाचे भारतीय संघाबरोबर होणारे सामने पाहण्यासाठी प्रेक्षकांना चांगलाच भुर्दंड सोसावा लागणार आहे. हिंदी क्रिकेट बोर्डाने वेस्ट इंडीज संघाला खेळण्यासाठी येण्याचे आमंत्रण देऊन त्याबद्दल १८ हजार पौंड बिदागी देण्याचे कबूल केले होते. रुपयाचा पौंडाशी असलेला दर पूर्वीचाच असता तर रुपयाच्या चलनात बोर्डाला २ लाख, ४० हजार रुपये द्यावे लागले असते. परंतु रुपयाच्या किंमतीत घट करण्यात आल्यामुळे सुमारे ३ लाख, ८० हजार रुपये आता द्यावे लागतील. म्हणजे अवमूल्यनामुळे भारतामधील क्रिकेट शौकिनांना आपल्या खिशातील १ लाख, ४० हजार रुपये अधिक द्यावे लागतील. संघाचा हा दौरा बोर्डाला बराच महाग पडणार आहे. ठरलेल्या बिदागीशिवाय वेस्ट इंडीज संघाचा भारतामधील विमानाचा प्रवासखर्च आणि संघाची बडदास्त ठेवण्यासाठी येणारा खर्चही बोर्डाला द्यावा लागेल. ठिकठिकाणच्या क्रिकेट संघटनांकडून सामन्यासाठी बोर्ड पैशाची हमी घेत असते. ह्या स्थानिक संघटनांकडे करण्यात येणारी पैशाची मागणी वाढविणे अवमूल्यनामुळे बोर्डाला भागच पडणार आहे. त्यामुळे स्थानिक संघटनांना सामन्याच्या तिकिटांचे दर वाढविल्याशिवाय गत्यंतर राहणार नाही. भारतामधून बाहेरदेशी जाणाऱ्या खेळाडूंच्या संघांनाही आपला खर्च भागविण्यासाठी स्पोर्टस कौन्सिलकडे अधिक पैसा मागावा लागेल. इंडियन हॉकी फेडरेशनतर्फे परदेशी पाठविण्यात येणाऱ्या संघाच्या खर्चात बरीच वाढ होईल. खेळाडूंच्या इतर संघांचा परदेशी खर्चही वाढेल.

## अवमूल्यनाची सूचना जागतिक बँकेची

४ थ्या पंचवार्षिक योजनेसाठी मदत मिळविण्यासाठी भारताचे एक प्रतिनिधिमंडळ अलीकडे वॉशिंग्टनला जाऊन आले. ह्या मंडळाला जागतिक बँकेने आणि अमेरिकेने ज्या तीन सूचना केल्या होत्या त्यांतील एक सूचना हिंदी रुपयाचे अवमूल्यन करण्यात यावे अशी होती. मे अखेर लंडनमध्ये प्रसिद्ध झालेल्या 'इकॉनॉमिस्ट' ह्या नियतकालिकात आलेल्या एका लेखात अवमूल्यनाचा सुगावा लागतो. नियतकालिकातील लेखाप्रमाणे भारताला करण्यात आलेल्या इतर सूचनांत संरक्षक खर्चावर बंधने घालणे, रुपया व इतर परदेशीय चलने ह्यांच्यांतील बदलाचे दर अधिक वस्तुस्थितीनिदर्शक राखणे आणि परदेशातील खाजगी भांडवलाला भारतात पैसे गुंतविण्यासाठी अधिक सवलती देणे, ह्यांचा समावेश होता. भारत सरकारने मात्र जागतिक बँकेच्या दडपणामुळे अवमूल्यन केल्याचा इन्कार केला आहे.

## चित्रपटाच्या धंद्यावर अवमूल्यनाचा परिणाम

फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया ह्या संघटनेचे अध्यक्ष श्री. श्रीनिवासन ह्यांनी असे मत व्यक्त केले आहे की भारत सरकारने रुपयाचे अवमूल्यन केल्यामुळे चित्रपटाच्या धंद्यावर वाईट परिणाम होईल. आयात करण्यात येणाऱ्या कच्च्या फिल्मची किंमत ५० टक्क्यांनी वाढेल. चित्रपटांची निर्यात करण्यासाठी एक निर्यात-वाढ मंडळ स्थापन करण्यात आले होते. पण आता ही योजनाच रद्द करण्यात आल्याने रंगीत चित्रपट निर्माण करणे जवळ जवळ बंदच होईल.

## परदेशातील हिंदी विद्यार्थ्यांना कर्जे

भारतामधून शिकण्यासाठी परदेशी गेलेल्या हिंदी विद्यार्थ्यांच्या खर्चात रुपयाच्या अवमूल्यनामुळे वाढ होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना सरकारने परदेशीय चलन उपलब्ध करून दिलेले आहे त्यांना येणाऱ्या जादा खर्चाची भरपाई भारत सरकार करणार आहे. मात्र ही भरपाई त्यांना कर्जाच्या स्वरूपात देण्यात येणार आहे. सरकारी छात्रवृत्त्या मिळवून परदेशात अभ्यासासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर अवमूल्यनाचा काय परिणाम होतो ते अजमावण्यासाठी भारत सरकारच्या शिक्षणखात्याने एका अभ्यासगटाची स्थापना केली आहे. कर्जाच्या अटी व इतर बाबी अद्याप निश्चित करण्यात आलेल्या नाहीत. हे काम अभ्यासगटाच्या सल्ल्याने करण्यात येईल.

## पटकीची साथ येण्याची शक्यता

भारत सरकारच्या आरोग्य खात्याने जाहीर केलेल्या माहितीप्रमाणे १९६६-६७ सालात देशात पटकीची साथ पसरण्याचा धोका आहे. साथ पसरली तर ती ५० हजार माणसांचे बळी घेईल असा अंदाज करण्यात आला आहे. आसाम, गुजरात, केरळ, पंजाब आणि राजस्थान ह्या राज्यांतून गेली पांच वर्षे पटकीमुळे दगावलेल्या लोकांची संख्या अल्प होती. परंतु १९६५ सालात मात्र रोगाचा आढळ अधिक प्रमाणात दिसून आला. आशियातील दुसऱ्या काही देशांतून ह्या रोगाचे जंतू भारतात आले आहेत. आरोग्य खात्याने साथीला तोंड देण्यासाठी उपाययोजना करण्यास प्रारंभ केला आहे. पटकीच्या साथीला आळा घालण्यासाठी एक मध्यवर्ती संघटना उभारण्यात आली असून त्याशिवाय दोन विभागीय संघटनाही स्थापन करण्यात आल्या आहेत.

## योग्य माणसांची वाण भासते

भारतामधील सुशिक्षितांची बेकारी हा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. अनेक पदवीधर तरुण नोकऱ्यांच्या शोधासाठी वणवण भटकतांना दिसतात. पण त्याचबरोबर चांगल्या नोकऱ्यांना योग्य अशी माणसे मिळत नसल्याचेही आढळून येते. नाविक शिक्षण देणाऱ्या 'डफरिन' ह्या बोटीसंबंधीच्या वार्षिक अहवालात असेच एक उदाहरण आढळून आले आहे. ह्या बोटीवर गणित आणि पदार्थविज्ञान हे विषय शिकवू शकणाऱ्या न्याख्यात्यांची गरज होती. परंतु गेली चार वर्षे ही जागा रिकामी आहे. कारण, ह्या जागेसाठी योग्य अशा प्रकारचा उमेदवार आला नाही. तीच कथा आणखी दोन जागांची. बोटीवरील सैनिकांना भूगोल आणि सामाजिक शास्त्रे शिकवू शकणाऱ्या दोन माणसांची गरज होती. गेल्या सप्टेंबर महिन्यापासून ह्या दोन जागाही भरू शकल्या नाहीत. कारण, योग्य अशा माणसांनी त्यासाठी अर्जच केले नाहीत.

## आशिया खंडात ३० कोटी निरक्षर लोक

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शैक्षणिक आणि वैज्ञानिक उपसंघटनेने जमा केलेल्या माहितीप्रमाणे जगात ७० कोटी लोक निरक्षर आहेत. त्यांतील ३० कोटी लोक आशिया खंडातील आहेत. निरनिराळ्या देशात सामाजिक विकासाचे अनेक कार्यक्रम संघटनेने हाती घेतलेले असून त्यात २२ हजार माणसे काम करीत आहेत. चालू साली प्रौढांची निरक्षरता नाहीशी करण्यासाठी संघटना मोठा कार्यक्रम हाती घेणार आहे.

## धोतरांना आता कोण विचारतो ?

सौ. तारा चेरियन ह्यांनी वसंत व्याख्यानमालेतील आपल्या भाषणात, हिंदी स्त्रियांच्या साडीचा अत्यंत गौरवाने उल्लेख केला. भारतीय संस्कृतीचे हे प्रतीक भारताबाहेरही लोकप्रिय होत आहे. स्त्रियांच्या साडीप्रमाणे पुरुषांच्या धोतराची मात्र परिस्थिती नाही. शंभर पुरुषांपैकी एखादाच ते डौलाने नेसू शकतो. नेसण्याच्या पद्धतीमधील वैचित्र्य धोतराचा रुबाब वाढविण्यास कारणीभूत होतोच असे नाही. धोतराचे विविध उपयोग असूनही तरुण पिढीला ते नावडीचे झाले आहे; तरुणांना ते नेसताही येत नाही. धोतर नेसणाऱ्याला काही समाजात मान मिळत नाही; तो तसाच एखादा मंत्री, महामहोपाध्याय किंवा धनंजय असेल, तर गोष्ट वेगळी. एरव्ही, 'धोतऱ्या' म्हणून त्याचा उपहास केला जातो; मग ते धोतर किती का स्वच्छ आणि इस्त्रीचे असेना आणि उपहास करणारांची पँट किंवा लेंगा मळकट, कुसकरलेल्या स्थितीत असेना.

धोतराच्या लोकप्रियतेचे प्रतिबिंब धोतरांच्या उत्पादनाच्या आकड्यात पडणे स्वाभाविक आहे. १९४० साली भारतातील धोतरांचे उत्पादन १०३ कोटी मीटर्स एवढे झाले. पुढील वर्षी ते ८१ कोटी मीटर्सवर उतरले; म्हणजे उत्पादनात १५% घट झाली. १९५०–६० ह्या दहा वर्षांच्या काळात धोतरांच्या वार्षिक उत्पादनाची सरासरी ४० ते ६० कोटी मीटर्स एवढी होती. १९६० नंतर धोतरांचे उत्पादन आणखी घटून ते ४० कोटी मीटर्सवर आले. १९६१ मध्ये ते सुमारे तेवढेच राहिले. १९६२ मध्ये ३५ कोटी मीटर्स, १९६३ मध्ये ३३ कोटी मीटर्स, असे ते घसरत गेले. १९६४ मध्ये मात्र उत्पादनात थोडीशी वाढ होऊन ते ३० लक्ष टन अधिक भरले. ह्या आकड्यात हातमागावरील उत्पादनाचा समावेश नाही, कारण त्याबाबत विश्वसनीय आकडे मिळू शकत नाहीत. गेल्या २५ वर्षांत लोकसंख्या एवढी भरमसाट वाढूनही आणि राहणीच्या मानात सुधारणा होऊनहि, धोतरांचे उत्पादन मात्र ३२% ने कमी झाले, ह्याचा अर्थ धोतरांची जागा पँट, पायजमा, हे घेऊ लागले आहेत आणि धोतर हे वयस्क माणसाचे प्रतीक होऊ लागले आहे, हे उघड आहे.

धोतर नेसता न येणे, हे आता दूषण उरलेले नसून ती अभिमानाची बाब झाली आहे. "तुला धोतर नेसता येते का?" असा तरुणांना प्रश्न विचारण्यासही म्हातारे लोक धजत नाहीत; पण त्यांच्यातलेच आता कितीतरीजण पायजाम्यात वावरू लागले आहेत! ज्या साडीचा सौ. तारा चेरियन ह्यांनी एवढ्या अभिमानाने उल्लेख केला, तिच्या भवितव्याबद्दल तूर्त तरी काळजीचे कारण नाही; पण शाळा–कॉलेजातून साडी ही समारंभाची बाब होऊ लागली असून स्कर्ट, सलवार आणि चुरिदार ह्यांचे आकर्षण वाढत आहे. अविवाहित तरुणींतील साड्यांचा खप मोठ्या शहरातून तरी खूपच उतरला आहे. पाहू पुढे काय होते ते.





बँक ऑफ महाराष्ट्र
लिमिटेड

M B

आपल्या १०० हून अधिक शाखाद्वारे आपली सर्व तऱ्हेची सेवा करण्यांस तत्पर आहे.

रजिस्टर्ड ऑफिसः ११७७ बुधवार पेठ, पुणे-२.


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.